अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर



### उधारीवर दारू मागितली म्हणून मारहाण

**सोलापूर** : उधारीवर दारू मागितल्याच्या कारणावरून काठी आणि लोखंडी टेबलने केलेल्या मारहाणीत ३५ वर्षीय तरुण जखमी झाला. ही घटना उळे (ता.उत्तर सोलापूर) येथे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. उमाकांत दिगंबर शिंदे (वय ३५ रा.उळे) असे जखमीचे नाव आहे.त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात सुधीर पवार (नातेवाईक) यांनी दाखल केले. काल रात्री ८ वाजेच्या सुमारास तो गावात दारू पिण्यासाठी गेला होता. उधारीवर दारू मागितल्याच्या कारणावरून त्याला बाळकृष्ण वडणे, रखमाजी वडणे, लक्ष्मण वडणे आणि अन्य दोघांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### पत्नीच्या तोंडावर ॲसिड टाकणाऱ्या पतीला अटक

**अक्कलकोट** : माहेरी राहण्यात आलेल्या पत्नीच्या तोंडावर ॲसिड फेकून मारहाण करणाऱ्या पतीला अक्कलकोट उत्तरच्या पोलिसांनी अटक केली. त्याला १ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश अक्कलकोटच्या न्यायालयाने दिला आहे. हणमंत महादेव म्हमाणे (वय ३४ रा. रामपूर ता.दक्षिण सोलापूर) असे आरोपीचे नाव आहे. तो गुरुवारी दुपारच्या सुमारास हालहळ्ळी (ता.अक्कलकोट) येथे सासरी गेला होता. आणि पत्नी भारती म्हमाणे (वय २७) हिला तू मला सोडून माहेरी का राहते,असे म्हणून तिला मारहाण केली. त्यानंतर तिच्या तोंडावर सोबत आणलेल्या प्लास्टिकच्या बाटली मधील ॲसिड टाकून पसार झाला. जखमी अवस्थेत भारती म्हमाणे हिला तिच्या भावाने सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. पोलिसांनी हणमंत म्हमाणेला अटक करून पोलीस कोठडी घेतली.

# भविष्यकारांच्या स्वत:च्या भविष्याचा खेळ कुणाला कळला?
# जगाचं भविष्य वर्तविणाऱ्यांचेच भविष्य अंधकारात!

शिवाजी भोसले, दीपक शिराळकर/सोलापूर

- सिद्धेश्वर पंचकट्ट्यासह सिव्हील हॉस्पिटल परिसरात भविष्यकारांचा ठिय्या कायमच
- स्वत:च्या कर्तृत्वावर विश्वास नसणारे भविष्यकारापुढं हात पुढं करुन दाखवताहेत हस्तरेषा
- करणी, भानामती झाल्याचे चुकीचे काही तरी मोघम सांगण्यातून अनेकजणांची वाढते अस्वस्थता
- ‘भविष्यकारांना खूप काही कळते’ या अंध विश्वासाने अनेकजण येतात भविष्यकाराकडे

‘खेळ कुणाला दैवाचा कळला’ हे अर्थपूर्ण गाणे देवता चित्रपटातले आहे. यालाच अनुसरून, सोलापुरात जागोजागी बसून इतरांचे भविष्य वर्तवणाऱ्यांना स्वत:च्या भविष्याचा खेळ कळला आहे का ? हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. साऱ्या जगाचं भविष्य सांगणाऱ्या ‘त्या’ भविष्यकारांचा वर्षानुवर्षे ठिय्या इथल्या सिद्धेश्वर पंचकट्टा अन् सिव्हिल हॉस्पिटलसह अन्य ठिकाणी कायम आहे. इतरांचे भविष्य सांगून आयुष्य बदलू पाहणाऱ्यांना त्यांचे स्वत:चे भविष्य मात्र अजिबात उज्वल करता आलेले नाही, कसलीच प्रगती ते करू शकले नाहीत, जे स्वत:चे भविष्य बदलू शकत नाहीत, ते इतरांचे काय बदलणार हा खरा ‘कळी’चा मुद्दा. तरीपण ‘भविष्यकारांना खूप काही कळते’ यावर आंधळा विश्वास असणारे समाजामधील कित्येकजण या भविष्यकारांकडे जातात. स्वत:च्या मनगटामधील धमक अन् स्वत:च्या कर्तृत्वावर विश्वास न ठेवता ज्यांना स्वत:चे काही कळत नाही अशा भविष्यकारांच्या समोर हात पुढे करून हस्तरेषा पाहायला लावणारे रोजच अशा भविष्यकारांपुढे दिसतात.



दरम्यान, भविष्य सांगताना समोरच्याला भावनिक करुन करणी, भानामती, गंडा दोरा बांधणे असे कोणीतरी तुमच्याबाबतीत काही वेगळे केल्याचे सांगून, त्यांचे जे काही सध्या बरे चाललेले असते, त्यामध्ये व्यत्यय आणण्याचे खूळ हे भविष्यकार भविष्यावर अंधळा विश्वास असणाऱ्यांच्या डोक्यात घालतात, हे वास्तव आहे.

### कमाईमधील चतुराई

ज्या परिसरात लोकांची वर्दळ असते, त्यापेक्षा ज्या परिसरात लोक चिंतेने ग्रासलेले असतात त्याच मोक्याच्या कोर्ट, सिव्हील हॉस्पीटलसह अन्य ठिकाणी डवरी समाजाचे हे भविष्यकार लोक बसतात. भविष्य बघण्यासाठी चिंतेने ग्रासलेले लोक येतात, त्यावेळी त्यांना ‘बरं वाटेल’ असे काही सांगितले की भविष्य बघण्याचे जादा पैसे संबंधित देतात, ही ‘कमाईची नस’ या भविष्यकारांनी ओळखलेली आहे. कमाईमधून थोडीफार प्रगती या भविष्यकारांनी साधल्याचे सांगितले जाते.







### पैसे उकळण्यासाठी वाटेल ते काल्पनिक सांगण्याचा अट्टाहास

स्वत:ला भविष्यकार म्हणवून घेणाऱ्या डवरी समाजाच्या या भविष्यकारांची माहिती घेतली असता वेगळेच सत्य समोर आले. भविष्य जाणून घेण्यासाठी येणाऱ्यांना भावनिक बनिवण्याचे कौशल्य त्यांच्याकडे आहे. या आधारे ते अत्यंत चुकीचे आणि विचलीत करणारे भयानक सांगतात. ‘तुम्हाला करणी केली आहे, भानामतीची बाधा आहे, तुमचं न बघविणाऱ्यांनी तुमच्याबद्दल गंडेदौरे बांधून मजबूत बांधणी केली आहे, हे सगळे करणारा तुमच्या नातेवाईकापैकीच आहे, भावकीमधला आहे, बाई आहे, तुमचं भयानक वाटोळे होणारं आहे, अमावस्येला केले आहे’ असे अत्यंत चुकीचे आणि काल्पनिक सांगून हे भविष्यकार पैसे उकरण्याचे धंदे करताहेत. दैनिक ‘सुराज्य’ ने केलेल्या स्टींग ऑपरेशमधून हे वास्तव समोर आले आहे.

### दैनिक ‘सुराज्य’ ने ‘त्या’ भविष्यकारांना ‘हे’ प्रश्न विचारले

**दरम्यान एकाही प्रश्नाचे उत्तर न देता भविष्यकारांनी पळ काढला.**

**सुराज्य चे प्रश्न :**

- तुम्ही इतरांचे भविष्य सांगत रस्त्यावरचं आयुष्य जगणार याबद्दलचे तुमचे भविष्य आम्हाला पचांग वा भविष्याच्या पुस्तकांमध्ये दाखवणार का?
- करणी वा भानामतीचा प्रयोग कोणावर खरोखरच होतो का?
- होत असेल तर तो करणारा तुम्ही पाहिला आहे का?
- करणी, भानामतीचा प्रयोग तरी काय असतो, तो खरा असतो असा जर दावा असेल तर तो सिद्ध करावा
- इतरांचे भविष्य बघता बघता भविष्यकार म्हणून तुम्ही स्वत:चे भविष्य काय उज्वल केले आहे का? असेल तर कसे ?
- करणी, भानामती हे नात्यामधील तसेच भावकीमधील, जळणारी व्यक्ती करते हे कशाच्या आधारे?
- तुमचा भविष्याचा धंदा चांगला चालू नये, यासाठी तुमच्यावर जळणाऱ्यांनी तुमच्यावर करणी, भानामतीचा प्रयोग केला आहे का?

**मनात विष पेरणे अन् संशयाची सुई... :** ठोसपणे काही न सांगता येणारे भविष्यकार काल्पनिक आणि चुकीचे काही तरी सांगून कोणाच्या तरी मनात कोणाच्या विरुद्ध विष पेरतात. त्यातून कलह वाढण्याचे प्रकार घडतात हे वास्तव आहे. ‘तुमच्या विरुद्ध कांड करणारा किंवा करणारी, करणी वा भानापती करणारी किंवा करणारी हा तुमच्या नातेवाईकामधील, भावकीमधीलच आहे, दुसरा कोणीच नाही’ असे हे भविष्कार काल्पनिक ठोकून देतात. विष पेरतात. ज्यांना कोणाला असे सांगितले जाते तो व्यक्ती किंवा ती व्यक्ती आपल्या विरुद्ध कोण असेल असं तर्क काढते आणि विनाकारण मनात घृणा निर्माण करुन घेते, गैरसमज करुन घेते. अशा प्रकरणामधून भांडणाच्या घटना घडताहेत.

**रास अन् हस्तरेषांवरुन वर्तवतात भविष्य :** सिद्धेश्वर पंचकट्टा तसेच सिव्हील हॉस्पीटल परिसरात बसणारे हे भविष्यकार सोलापुरातील डवरी या भटकी समाजामधील आहेत. पंचांग आणि हस्तरेषावरुन भविष्य सांगण्याची काही पुस्तके यांच्या आधारे हे भविष्यकार रास आणि हस्तरेषेच्या आधारे भविष्य सांगतात. वास्तविक पंचांग आणि हस्तरेषा या आधारे भविष्य वर्तवणे इथपर्यंत ठीक. पण वेगळेच काही चुकीचे आणि काल्पनिक सांगून भविष्य बघायला येणाऱ्यांच्या डोक्यात खूळ घालणे हे आक्षेपार्ह आहे.

**मंत्र देण्याआडून कमाईचा धंदा :** करणी, भानामती केल्याचा प्रकार जेव्हा भविष्यकाराकडून सांगितला जातो, त्यावर उपाय काढून द्या, असा हट्ट भविष्य बघणारे जेव्हा धरतात, तिथेच या भविष्यकाराच्या चांगल्या कमाईचा टप्पा येतो. मंत्र देतो त्रास कमी होईल, मात्र एवढे तेवढे पैसे द्यावे लागतील असा हेका भविष्यकाराकडून धरला जातो. शेवटी तजवीज होते. मंत्र सांगण्याच्या बदल्यात ४०० ते १ हजारापर्यंत पैसे भविष्यकार उकळतात.



### अज्ञात कारणावरुन कुडलसंगममध्ये मारहाण

**सोलापूर** : कुडलसंगम मंद्रूप (ता.दक्षिण सोलापूर) येथे बांबू आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत संगप्पा शामराव पाटील (वय ४९) हे जखमी झाले. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. ते रात्री १० वाजेच्या सुमारास शेतात दुसऱ्या सोबत बोलत थांबले होते. त्यावेळी केदार पाटील यानी अज्ञात कारणावरून त्यांना मारहाण केली. त्यांना म्बुलन्स मधून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसात याची नोंद झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



रिल्सच्या नादात काहीपण करू नकोस !

कल्याण
459-82-679

# २४ तासात ‘ते’ दिसले नाहीत; पण ठसे हे ‘त्यांचेच !’
# ऊस शेती अन् पावसाच्या दलदलीने शोध कार्यात अडथळे

- वस्त्यांवर वाढविले ट्रॅप कॅमेरे
- नागरिकांमधील दहशत कमी करण्याचे प्रयत्न
- अलर्ट वन विभाग फुल्ल टेन्शनमध्ये
- नागरिकांमध्ये धास्ती मात्र कायमच

सोलापूर/खास प्रतिनिधी

**सोरेगाव अन् भाटेवाडीसह अन्य परिसरात बिबट्यांची वन विभागाच्यावतीने शोध मोहीम सुरूच आहे. शोध मोहिमेतंर्गत २४ तासात अद्याप त्यांचे दर्शन दिसले नाही.पण आढळून आलेले ठसे हे बिबट्यांचेच असल्याची माहिती वन विभागाकडून समोर आली आहे. ऊस शेती आणि पावसाच्या दलदलीमुळे शोध कार्यात मोठे अडथळे येत असल्याची माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात येत आहे. बिबट्यांचा शोध लवकर लागावा, यादृष्टीने आज शनिवारी (ता.२०) वस्त्यांवर लावण्यात आलेली ट्रॅप कॅमेऱ्यांची संख्या वाढविण्यात आली आहे. शिवाय बिबट्यांसंबंधी नागरिकांमधील दहशत कमी करण्याचे प्रयत्न वन विभागाकडून सुरू असले तरी सोरेगावसह परिसरातील नागरिकांमध्ये धास्तीचे वातावरण कायम असल्याचे शनिवारी चित्र होते.**








**सोलापूर : बिबट्याच्या शोध मोहिमेत सक्रीय रेसक्यु व्हॅन. दुसऱ्या छायाचित्रात बिबट्याला पकडण्यासाठी लावण्यात आलेला पिंजरा. तिसऱ्या छायाचित्रात बिबट्यामुळे निर्माण झालेली दहशत कमी करण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये उद्बोदन करणारी वनविभागाची टीम.**

### बिबटे सोशल मीडियावरचे नव्हे; माढा, मोहोळ भागातील असू शकतात

सोरेगाव-भाटेवाडी परिसरात बिबटे आढळले नाहीत. बिबट्यासंबंधी जे व्हिडीओ व्हायरल करण्यात आले, ते औरंगाबाद आणि नाशिक इथले असल्याचा दावा एका बाजूला करण्यात येत असला तरी सोरेगाव-भाटेवाडी या ठिकाण दिसलेला बिबट्या हा माढा, मंगळवेढा आणि पंढरपूर या परिसरातील असावा, असा खुद्द तर्क वन विभागाचा आहे. साधारण बिबट्याच्या वावरण्याचा परीघ हा २० ते ४० कि.मी.चा असतो. यापूर्वी ज्या ठिकाणी बिबट्या दिसला तोच बिबट्या सोरेगाव परिसरात आलेला असू शकतो, असाही अंदाज व्यक्त केला जातोय.

### हल्यावरुन मिळू शकतो दुजोरा

बिबट्यांकडून शेळी, मेंढी किंवा रेडू, वासरु यांच्या हल्ला झाला. यासंबंधीची बाब समोर आल्यास बिबट्याचा वावर हा संबंधित परिसरात आहे, हे नेमकेपणाने सांगता येईल, मात्र अद्याप हल्ला झाल्याची माहिती वन विभागाकडे आलेली नाही. सोलापूर सिव्हिल हॉस्पिटला अनेक राज्यातून जिल्ह्यातुन रुग्ण येत असतात. कारण येथे सर्व प्रकारचे आजार एक मात्र उपाय म्हणजे सोलापूर सिव्हिल हॉस्पिटल. रोज अनेक रुग्णांच्या मयत जातात तर, कोणी चांगला उपचार घेऊन बरेही होतात. याच रुग्णांसोबत आपले नातेवाईक आलेले असतात.या नातेवाईकांना खूप काळजी लागलेली असते. माझ्या लेकराचं काय होईल? असा प्रश्न पडत असतो. अस झालं की, बाहेर सिव्हिल हॉस्पिटल बाहेर ४ ते ५ ज्योतिष बसलेले असतात. आपले नातेवाईक ज्योतिषाकडे जातात. अन रुग्णाची परिस्थिती अशी आहे वाचेल का? रुग्णांचे नातेवाईकअसा प्रश्न उपस्थित करतात. आपल्याला ज्योतिषाचा उत्तर लगेच ऐकायला मिळत. त्याचे अमुक रास आहे. त्याचा अमुक वार घातक आहे. त्यांना कोणाचं वाईट केलं नाही. कधी कोणाच्या आशेवर बसला नाही. पण त्याच्या जीवाला शांती नाही. त्याच्या मनाला समाधान नाही. त्याच्यावर शत्रू लोक जळतात. त्याच्या भावकीतील पाहुण्यातील एका व्यक्तीने चक्कर केली आहे. यावर एक उपाय आहे. एक यंत्र आहे अमुख देवाचे तुम्ही घ्या, तुमचा रुग्ण बराच होईल. असे सांगितले जाते.





बिबट्यांची शोध मोहीम सुरु आहे. या अंतर्गतच बिबट्यांना सुरक्षित मार्ग काढून देण्याचीदेखील तयारी वन विभागाची आहे. बिबटे दिसले तरी थेट त्यांना गतप्राण करता येणार नाही, त्यांना ताब्यात घेण्याचे प्रयत्न होतील, त्यासाठी वेगळी यंत्रणा लावली जाईल, नागरिकांमधील दशहत कमी करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. ट्रॅप कॅमेरे वाढविण्यात आले आहेत. सध्या स्थितीत बिबटे नाहीत असंदेखील म्हणता येत नाही. जे ठसे आढळताहेत ते बिबट्याचे दिसताहेत. मात्र, बिबट्याने शिकार केल्याची माहिती पुढे आलेली नाही.

**- धैर्यशील पाटील,** उपवन संरक्षक अधिकारी, सोलापूर

### कामती, डोणगाव परिसरातसुद्धा शोध कार्य

सोरेगाव-भाटेवाडी शिवारात बिबट्या दिसल्यानंतर वन विभागाने शोध कार्य काल शुक्रवारपासून हाती घेतले आहे. मुख्य सोरेगावसह भाटवाडी तसेच डोणगाव, कामती आदी ठिकाणी कॅनॉल परिसर, बागायती शेती, शिवाय दडण्याच्या जागी बिबट्यांचा शोध सुरु आहे. बागायती ऊस शेती तसेच पावसाच्या पाण्यानं शेतात झालेली चिखल-पाण्याची दलदल यामुळे बिबट्यांच्या शोध कार्यात अडथळे येत आहेत.

### नागरिकांमधील दहशत कमी करण्यावर भर

रेस्क्यू गाडीसह वन विभागाच्या अन्य दोन गाड्यांद्वारे ७-८ कर्मचाऱ्यांच्या पथकांकडून बिबट्याचे शोध कार्य सुरु ठेवतानाच ज्या भागात बिबट्याचा दिसल्याची चर्चा आहे, त्या भागातील गावात, वस्त्यांवर जाऊन लोकांमधील दशहत कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्पीकरची गाडी फिरवून तसेच प्रत्यक्ष नागरिकांशी चर्चा करुन बिबट्यांसंबंधीची निर्माण झालेली घबराहट कमी करण्याचा प्रयत्न सुरु आहे.